दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.१६ मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १९८ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 16 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 198 • Pages 4 • Rate 4 Rs

### महाराष्ट्रात १.०८ लाख घरांवर सौरऊर्जा प्रकल्प

**मुंबई–**प्रधानमंत्री सुर्यघर मोफज वीज योजनेमध्ये महाराष्ट्रात मागील एक वर्षात १.०८ लाख घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले असून महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावल्याची माहिती वीज कंपनीच्या सूत्रांनी दिली आहे.देशात महिना तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे व अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना हाती घेतली आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या थेट उपयोगाच्या या योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याच्या सूचना राज्य शासनाने सर्व जिल्हयातील वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात या योजनेला मोठा प्रतिसादही मिळू लागला आहे.दरम्यान, केंद्र सरकारने गेल्या पाच महिन्यांतील योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत किती ग्राहकांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले याची माहिती घेतली.

# बारामती आणि राहुरी विधान सभेसाठी पोटनिवडणूक जाहीर

## २३ एप्रिलला मतदान, तर ४ मे रोजी निकाल; राजकीय हालचालींना वेग

### राहुरीत महाविकास आघाडी ताकदीने लढणार

**भाजपचे राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे १७ ऑक्टोबर २०२५ रोजी निधन झाल्यामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी आता पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले असून, महाविकास आघाडी ही निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढणार असल्याचे चिन्हे आहेत. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आपला उमेदवार देण्याची दाट शक्यता असून, माजी आमदार पराजक्त तनपुरे हे शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दुसरीकडे, सत्ताधारी भाजपकडून कोणाला संधी दिली जाते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल, कारण दिवंगत आमदारांचे पुत्र अक्षय कर्डिले यांच्या नावाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाने तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि पुदूचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले असून, तामिळनाडू, आसाम, केरळ व पुदूचेरीमध्ये एकाच टप्प्यात, तर पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत मतदान पार पडणार आहे. या निवडणुकांसोबतच देशातील विविध राज्यांमधील ८ रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांचा समावेश असून, या दोन्ही जागांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान आणि ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे आणि बारामतीचे आमदार तथा माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातातील निधनामुळे रिक्त झालेल्या या दोन्ही जागांसाठी आता पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे. राहुरी आणि बारामती या दोन्ही मतदारसंघांतील लोकप्रतिनिधींच्या अकाली एक्झिटमुळे या जागा रिक्त झाल्या होत्या, ज्यावर आता निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, या निवडणुकीची अधिकृत अधिसूचना ३० मार्च २०२६ रोजी जारी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ६ एप्रिल २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ७ एप्रिल रोजी अर्जांची छानणी केली जाईल आणि अर्ज मागे घेण्यासाठी ९ एप्रिल ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया २३ एप्रिल २०२६ रोजी पार पडणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल स्पष्ट होईल. तसेच ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



### बारामतीत सुनेत्रा पवार लढणार


**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची उमेदवारी निश्चित केली असून, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना या वृत्ताला दुजोरा दिला आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या निवडणुकीत आपला उमेदवार रिंगणात उतरवणार नसल्याची माहिती समोर येत असल्याने, बारामतीची ही जागा बिनविरोध होणार की अन्य कोणी अपक्ष किंवा इतर पक्षाचा उमेदवार आव्हान देणार, याकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**

## मुलगी जन्माला आल्यास १० हजार रुपये खात्यावर जमा
## खा.सोनवणे यांची घोषणा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन तथा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी २०२५-२६ गळीत हंगामाच्या कार्यक्रमात कर्मचारी आणि सभासदांसाठी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. कारखान्याशी संबंधित कर्मचारी तसेच सभासदांच्या घरी मुलगी जन्माला आल्यास त्या कुटुंबाच्या खात्यावर १० हजार रुपये जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

मुलींचा जन्म साजरा व्हावा, तसेच समाजात मुलींबाबत सकारात्मक विचार वाढावा या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे खासदार सोनवणे यांनी सांगितले. या उपक्रमामुळे मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळेल आणि कारखान्याच्या सभासद व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.कारखान्याच्या गळीत हंगामाच्या कार्यक्रमात विभाग प्रमुख,मान्यवर, सभासद व कर्मचारी उपस्थित होते. या घोषणेचे उपस्थितांकडून स्वागत करण्यात आले असून हा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.



## ग्राहकांचे हित जपणे ही अस्थापनांची जबाबदारी–डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ग्राहकांचे हित जपने ही प्रत्येक क्षेत्रातील अस्थापनांची जबाबदारी आहे असे प्रतिपादन आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि. बीडचे संस्थापक,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले कि, ग्राहकांचे हित जपणे ही प्रत्येक अस्थापनेची जबाबदारी आहे असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.दि. १५ मार्च २०२६ रोजी आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड यांच्या संयुक्तविद्यमाने जागतिक ग्राहक दिन परिसंवाद, ग्रंथवाचन,तसेच बेडूक उड्या,लंगडी स्पर्धा, खो-खो स्पर्धा घेवून साजरा करण्यात आला.



सकाळी ९ ते १० या वेळेत परिसंवाद घेण्यात आला.माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव,अरुण गायकवाड,बाळासाहेब गायकवाड यांनी सहभागी होवून विचार व्यक्त केले.९ ते १० या वेळेत ग्रंथवाचन घेण्यात आले.अंकितागायकवाड, ज्ञानेश्वरी पुंड,श्रुती पुंड, वेदिका गायकवाड यांच्या सह विद्यार्थी वाचकांनी सहभाग घेतला.११ ते १२ या वेळात बेडुक उडया घेण्यात आल्या. यात प्रथम सुशांत सौदागर,द्वितीय आनंद गायकवाड,तृतीय शिवम गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले.१२ ते १ या वेळेत लंगडी स्पर्धा घेण्यात आल्या.यात प्रथम वेदिका गायकवाड, द्वितीय आनंद गायकवाड,तृतीय शिवम गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले.१ ते २ या वेळेत खो – खो स्पर्धा घेण्यात आल्या.यात हरिओम गायकवाड, विराज राऊती,आनंद गायकवाड,सुशांत सौदागर,सोहम गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले.२ ते ३ या वेळेत बक्षीस वितरण डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड, अंकिता गायकवाड, ज्ञानेश्वरी पुंड,श्रुती पुंड, रविराज गायकवाड, शिवतेज गायकवाड यांचे हस्ते बक्षीस वितरण व समारोप करण्यात आले.

शेवटी अध्यक्षीयसमारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.मोठ्या संख्येने, वाचक,ग्राहक,विद्यार्थी, विद्यार्थिनी,जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती.

# जातीच्या भिंती तोडा,आपली माती,माणस आणि नाती जपा

## 'गुरुकृपा' मंचावर संदीप पाठक भावनिक

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

आम्ही लहान होतो, त्यावेळी जाती धर्माच्या भिंती फार खुज्या होत्या, मागच्या काळात अनेकांनी त्यावर अनेक विटा रचून त्या माणसापेक्षाही मोठ्या केल्या आहेत. आपल्याला त्या भिंती तोडल्या पाहिजेत. जाती धर्माच्या भिंती तोडून आपली माती, माणस आणि नाती जपा असे भावनिक आवाहन अभिनेते संदीप पाठक यांनी केले. 'गुरुकृपा ' शिक्षण समूहाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रा. स्नेहल पाठक, संजय मालानी, डॉ. विनोद काकडे, व्यंकटेश वैष्णव, पांडुरंग उगले, डॉ रंगनाथ गोळेकर, डॉ. भांगरे, गुरुकृपा चे डॉ यशवंत राजेभोसले यांची यावेळी उपस्थिती होती.



यावेळी संदीप पाठक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आपल्या जुन्या आठवणी जागवल्या. कितीही मोठे झालात तरी आपल्या मातीला आणि आपल्या आईवडील, मित्रांना विसरू नका, हेच लोक आपले पाय जमिनीवर राहायला मदत करत असतात असे सांगितले. आईवडिलांना कर्जबाजारी करून लग्नावर कोट्यवधी खर्च करण्याची आजची पद्धत बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले तसेच जाती धर्माच्या पलीकडे जाऊन माणूसपण जपा, हा संस्कार इथल्या मातीचा आहे, हातात दगड घेऊन कोणाचे तरी रक्त काढण्याऐवजी रक्तदान करून कोणाचा तरी जीव वाचवा. जातीवाद, धर्मवाद हा आपला मूळ स्वभाव नाही तर माणुसकी हा आपला मूळ स्वभाव आहे तो जपा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ यशवंत राजेभोसले यांनी संदीप पाठक यांच्या जुन्या आठवणी जागवत गुरुकृपा समूहाचा प्रवास मांडला तर संजय मालानी यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मैत्रीचा परीघ वाढवावा त्यासोबतच प्रत्येकाने कोठे थांबायचे याचे भान ठेवावे असे सांगितले. डॉ विनोद काकडे यांनी गुरुकृपा मधून परिपूर्ण माणूस म्हणून विद्यार्थी निर्माण व्हावेत तसेच या परिवाराचा समाजाच्या विकासासाठी अधिकाधिक विस्तार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल म्हस्के यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर सोळंके यांनी केले.

यावेळी प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ वैशाली काकडे, डॉ प्रियंका राजेभोसले, प्राचार्य अमित बिंदू, प्राचार्य मकेश बाबू आदींची उपस्थिती होती.

**'वऱ्हाड ' ने उडविले हास्याचे कारंजे**

यावेळी संदीप पाठक यांनी वऱ्हाड निघालय लंडनला या एकपात्री प्रयोगातील काही प्रसंग सादर केले यावेळी सारा परिसर टाळ्या, शिट्ट्या आणि हास्याच्या कारंजांनी भरून गेला.

## देगलूर मध्ये युवासेनेची जनसेवा साठे चौकात मोफत थंड पाणपोई सुरु



दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

सामाजिक उपक्रमात सदैव अग्रेसर असलेल्या युवासेनेच्या वतीने नागरिकांसाठी मोफत थंड पाणपोई सुरू करून एक प्रकारे जनसेवेचे व्रत हाती घेतले आहे. या पाणपोईचे उद्घाटन शिंदे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते शुक्रवार दि. १३ मार्च रोजी दुपारी येथील साठे चौक येथे करण्यात आले.युवसेना अध्यक्ष नामदेव पाटील देगावकर यांच्या पुढाकारातून साठे चौक साईराज टी स्टॉल शेजारी ही मोफत थंड पाणपोई सुरू करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळा जाणवत असताना शहरातील नागरिक प्रवासी तसेच वाहनधारकांना या पाणपोईमुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ मुंबईचे संचालक तसेच खारदेव नगर व्यापारी मंडळाचे अध्यक्ष अशोक पाटील राजूरकर ड .अंकुशराजे जाधव, डॉ. मिलिंद शिकारे,डॉ. धुमाळे, डॉ. एकनाथ केरुरकर, ड कापसे, सुनील मदनुरे, मनोहर देगावकर, सुरेश चिलवेरी, सुनील थडके, सुनील पाटील, बंटी जाधव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास शिवसैनिक ,युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उन्हाच्या तडाख्यात नागरिकांना थंड पाण्याचा दिलासा देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून समाजसेवेच्या कार्यात युवासेना नेहमीच पुढाकार घेत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केला आहे.

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष; जिल्हास्तरीय समित्या स्थापन

## गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध

## अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने; राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही

## समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई;अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज इराण – इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णयही घेतला आहे.

आज या संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

**जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल. मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत.

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

**अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने.**

रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा



प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील. गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही.**

महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात.घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

---

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/०३/२०२६
संमतीपत्र अधारे
अर्जदाराचे नाव :- बारगजे महानंदा नवनाथ
रा.केज यांना श्री. सोमनाथ शंकरराव घुले रा. डोणगाव
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर ४३७८ खुला प्लॉट नं ----
वार्ड क्रं ---- विभाग ----
चर्तु:सिमा
पुर्व : १५ फूटाचा रस्ता
पश्चिम : धपाटे यांची जागा
दक्षिण : गव्हाणे
उत्तर : दिलीप जाधवर
लांबी :पू.प. ४५ फूट रुंदी : द.उ. ३० फूट
नोटरी संमतीपत्र दस्तऐवज नं.१८१७८ दि.२/१/२०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
खरेदी खताचा करारनामा अधारे
अर्जदाराचे नाव :- शेख गोरीबी मेहमूद
रा.केज यांना श्री. शेख बशीर इसाक रा.केज
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.२१२/२
घर नंबर ४५२३ पैकी खुला प्लॉट नं.----
वार्ड क्रं.८ विभाग-हाउसिंग कॉलनी
चतु:सिमा
पुर्व : १५ फुटाचा रस्ता
पश्चिम: चाँद मिस्त्री
दक्षिण : शेख बशीर
उत्तर : शेख शारुबी मौला
लांबी : पू.प.६० फूट रुंदी : द.उ.१० फूट
खरेदी खताचा करार नामा ३५६९ दि. २९/७/ २०१० आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
नोटरी संमती पत्र आधारे
अर्जदाराचे नाव :-१) ऋतुजा ऋषिकेश बारगजे २)सुषमा अक्षय बारगजे
रा.केज यांना श्री. मल्हारी खंडु बारगजे रा. टाकळी
यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
घर नंबर ५२०३ सर्वे.न.१२
वार्ड क्रं ५ विभाग-शिक्षक कॉलनी.
चतु:सिमा
पुर्व : रस्ता
पश्चिम : गाढवे यांची जागा वगैरे
दक्षिण : राजेभाऊ वेदपाठक
उत्तर : उमरी रस्ता
लांबी : पु.प. २४ फूट रुंदी : द.उ. ५० फूट
नोटरी संमती पत्र आधारे ४७५७ दि. ३०/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/०३/२०२६
दुरुस्ती पत्रक आधारे चतु:सीमा दुरुस्ती
अर्जदाराचे नाव :- विष्णू मधुकर गुंड
रा.केज यांना श्री. भगवानदास पापालाल लोहिया रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
घर नंबर ---- स.न.४००
वार्ड क्रं १७ विभाग- कळंब रोड
चतु:सिमा
पुर्व : खंदारे
पश्चिम: रस्ता
दक्षिण : संदिप कुमार जाधव
उत्तर :रस्ता
लांबी : पु.प. १२.३० मि. रुंदी : द.उ. ७.१७ मि.
दुरुस्ती पत्रक खताचा दस्तऐवज नं.४९० दि. १६/२/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.
खरेदी खत क्र.११९७
दि.४/४/२०२५

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/०३/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- रुबीना शरीफ शेख
रा.केज यांना श्री. गीतांजली चांगदेव शिंदे
रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
स.न.४८८ खुला प्लॉट नं.१३८ व १३९
वार्ड क्रं ८ विभाग :कळंब रोड
चतु:सिमा
पुर्व : वैजनाथ क्षीरसागर
पश्चिम: खुरेशी रफिक
दक्षिण : ४.५७ मीटरचा रस्ता
उत्तर : शमीम आरा.
लांबी : द.उ.९.८४ मि. रुंदी : पु.प. ९.७६ मि.
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. २८२ दि. २९/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
नोटरी संमतीपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव :- शेख सलमान अजिम
रा. केज यांना श्री. अजिम बनेमियाँ शेख
यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
घर नंबर १-१-२८ वार्ड क्रं .१४
विभाग. अजिज पुरा ( बोबडेवाडी रोड )
चतु:सिमा
पुर्व :रस्ता
पश्चिम:शेख इब्राहिम
दक्षिण :सय्यद शाहिन
उत्तर : रस्ता
लांबी :द.उ. ३० फूट रुंदी :पु.प.२० फूट
नोटरी संमतीपत्र खताचादस्त ऐवज नं.८७१३ दि. १३/२/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- किरण गणपतराव राऊत यांना श्री. गिन्यानदेव निवृत्ती नेहरकर रा. केज
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.२२९/४ खुला प्लॉट नं. ४८
वार्ड क्रं १३ विभाग- अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : ०६ मिटर रुंदीचा रस्ता
पश्चिम : मनिषा गोविंदराव नागरगोजे
दक्षिण : बाबासाहेब दादाराव तांदळे
उत्तर : ०९ मिटर रुंदीचा रस्ता
लांबी : पू.प.१२. १९ मिटर
रुंदी : द.उ.१२. १९ मिटर
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. १४७ दि. १३/१/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- विकास कल्याणराव दांगट
रा. केज यांना श्री. रामराजा मारुती गलांडे रा. केज यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर :६३६२ स.न.१०८/८
वार्ड क्रं २ विभाग- धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व : १५ फूटाचा रस्ता
पश्चिम : सरस्वती शाळेचे मैदान
दक्षिण : सुबराव सपाटे
उत्तर : चाटे सर
लांबी : द.उ. २९ फूट
रुंदी : पू.प. ३१ फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.४३०८ दि. २६/१२/२०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
खरेदी खत आधारे
अर्जदाराचे नाव :- रामदास देविदास तोगे रा. मुंडेवाडी
यांना श्री.आश्रुबा साहेबराव सिरसट
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर ४१५७ सर्वे.न.२५
वार्ड क्रं ५ विभाग- शिक्षक कॉलनी
चर्तु:सिमा
पुर्व : बाबासाहेब धर्मराज घुले
पश्चिम : रस्ता
दक्षिण : जगताप आर.आर.
उत्तर : १८ फुटाचा रस्ता
लांबी : पु.प. ३३ फुट रुंदी : द.उ. ३० फुट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. ३३८ दि.१२/२/२०१९ आहे.अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
खरेदी खत आधारे
अर्जदाराचे नाव : अजीज तुराब सय्यद
रा.केज यांना श्री. जहीर महेमुदमियाँ इनामदार रा. केज
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.४८२/अु खुला प्लॉट नं.----
वार्ड क्रं.८ विभाग- कळंब रोड
चर्तु:सिमा
पुर्व :इसाकोद्दीन अशकोद्दी व इतर
पश्चिम : २० फूट रुंदीचा रस्ता
दक्षिण : जावेद निजाम शेख
उत्तर : जहीर महेमुदमियाँ इनामदार
लांबी : द.उ.२३.१७ मि. रुंदी : पू.प.१२.१९ मि.
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.१४८७ दि.३०/४/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
नोटरी संमतीपत्र /हक्क सोडपत्रा आधारे
अर्जदाराचे नाव :- १)सटवा राजेंद्र चांदणे २)संतोष राजेंद्र चांदणे यांना श्री.१)वृंदावनी भाऊसाहेब चांदणे (२)सोनाली विजय वाघमारे (३)सतीश भाऊसाहेब चांदणे (४)गणेश भाऊसाहेब चांदणे (५)शेशाबाई दगडू चांदणे
यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
घर नंबर १८७६
वार्ड क्रं .३ विभाग- समर्थ नगर
चतु:सिमा
पुर्व : रस्ता
पश्चिम : फक्रोद्दीन इनामदार
दक्षिण : सजाद कचरू
उत्तर : भाऊसाहेब चौरे
लांबी : ३० फूट रुंदी : २० फूट
नोटरी संमती पत्र / हक्कसोडपत्र दस्तऐवज नं.९३८४ दि.६/२/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :-अनिता महादेव पांचाळ
रा.केज यांना श्री. सारिका अशोक सत्वधर
रा. केज यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न.२१६/२/१७ खुला प्लॉट नं----
वार्ड क्रं---- विभाग- अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व :२० फुट रस्ता
पश्चिम : सुभाष उत्तम मुंडे
दक्षिण : सत्वधर अशोक जयदेव
उत्तर : सत्वधर अशोक जयदेव
क्षेत्र : ०-०१.४६ आर.
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.२८४ दि.२९/१/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

# पंचशील विद्यालयात दिवंगत यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**दैनिक वादळ वार्ता**

**हदगांव । प्रतिनिधी**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले,मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

याप्रसंगी पर्यवेक्षक जाधव,एम आर.बेळकुंदे,शाळा प्रशासन प्रमुख संदीप ढोले सह शाळेतील शिक्षक,प्राध्यापक उपस्थित होते.

मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर चव्हाणांच्या कार्याला उजाळा देताना म्हणाले की,स्व.यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातील अत्यंत प्रभावशाली आणि दूरदर्शी नेते होते त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असे ही म्हटले जाते त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात,प्रशासनात आणि भारताच्या राष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.शिक्षण घेत असताना त्यांच्यावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव पडला आणि ते स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले.स्व.चव्हाण हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे कार्यकर्ते होते.

सहकार चळवळीला मोठे प्रोत्साहन,शेती आणि सिंचन प्रकल्पाचा विकास,उद्योगधंद्यांना चालना,ग्रामीण भागाच्या विकासासाठी योजना.हे त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाची कामे त्यांनी केली. यशवंतराव चव्हाण यांनी भारत सरकारमध्ये संरक्षण मंत्री,गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री,चरणसिंग यांच्या सरकार मध्ये उपपंतप्रधान असे अनेक मोठी पदे त्यांनी सांभाळली. स्व.यशवंतराव चव्हाण हे विचारवंत आणि लेखक ही होते त्याचे कृष्णाकाठ,सह्याद्रीचे वारे या पुस्तकात त्यांनी महाराष्ट्रातील समाज, राजकारण आणि संस्कृती या विषयी विचार मांडले असे सांगत दस्तूरकर यांनी स्व.चव्हाणांच्या कार्याला उजाळा दिला.

दिवंगत माजी खासदार हरिहरराव सोनूले हे स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या विषयी अनेक आठवणी सांगत असे संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांनी याप्रसंगी शिक्षकांसोबत चर्चा करतांन सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमररत्न वाढवे यांनी केले.



## चढ्या दराने खताची विक्री केल्याने देगलूर तालुक्यातील पाच कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित

**दैनिक वादळ वार्ता**

**देगलूर । प्रतिनिधी**

: देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्रांवर कारवाई केली आहे. रासायनिक खतांची कमाल विक्री किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री केल्याप्रकरणी पाच कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.शेतकऱ्यांकडून मिळालेल्या तक्रारीनंतर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय, देगलूर यांना तपासणीचे आदेश दिले होते. या तपासणी अहवालानुसार पांडुरंग कृषी सेवा केंद्र, गणेश कृषी सेवा केंद्र, जिजाई कृषी सेवा केंद्र, सोनी कृषी सेवा केंद्र आणि आनंद फर्टिलायझर्स, देगलूर या पाच कृषी निविष्ठा केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या.



तपासणीदरम्यान रासायनिक खतांची कमाल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, तसेच युरिया खत उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना विक्री न करणे अशा प्रकारच्या तक्रारींची पुष्टी झाल्याने सुनावणीनंतर संबंधित केंद्रांचे परवाने निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.दरम्यान, जिल्ह्यात कुठेही रासायनिक खतांची जादा दराने विक्री होत असल्यास, विनापरवाना विक्री होत असल्यास किंवा खते उपलब्ध असूनही विक्री केली जात नसल्यास नागरिकांनी तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा. तसेच शेतकऱ्यांनी केवळ परवानाधारक कृषी निविष्ठा केंद्रातूनच खते व इतर निविष्ठांची खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## खा.नागेश पाटील आष्टीकर साहेब यांचा दणका; उमरखेड बायपासवर वाहनधारकांना त्रास देणाऱ्या पोलिसांना भररस्त्यात विचारला जाब!

**दैनिक वादळ वार्ता**

**हदगाव । प्रतिनिधी**

उमरखेड बायपास हायवेवर वाहतूक पोलिसांकडून विनाकारण अडवणूक करून वाहनधारकांना त्रास दिला जात असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत हिंगोली लोकसभेचे लोकप्रिय खासदार मा. नागेश पाटील आष्टीकर यांनी आज अचानक घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कडक शब्दांत सुनावत, जनतेची पिळवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला.

नेमकी घटना काय?

गेल्या काही दिवसांपासून उमरखेड बायपासवर काही ट्रॅफिक पोलीस कर्मचारी सातत्याने तळ ठोकून येणाऱ्या-जाणाऱ्या छोट्या-मोठ्या वाहनधारकांना अडवत होते. नियमांचे उल्लंघन नसतानाही केवळ धाक दाखवून वाहनधारकांना मानसिक व आर्थिक त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी खासदारांकडे प्राप्त झाल्या होत्या.

आज खासदार आष्टीकर साहेब या मार्गावरून जात असताना त्यांना तिथे चार-



पाच वाहनधारकांना अडवून ठेवल्याचे प्रत्यक्ष दिसले. त्यांनी तातडीने आपली गाडी थांबवून संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना जाब विचारला.

शहरातील वाहतुकीकडे दुर्लक्ष, बायपासवर वसुली?

यावेळी खासदारांनी संताप व्यक्त करत म्हटले की, उमरखेड शहरात वाहतुकीची मोठी समस्या असून तिथे नियोजनाची गरज आहे. शहरात व्यवस्था लावण्याऐवजी हायवेवर उभे राहून सर्वसामान्य नागरिकांना त्रास देणे कितपत योग्य आहे? त्यांनी प्रशासनाला ठणकावून सांगितले की, जनतेला विनाकारण अडवणे किंवा त्यांचा छळ करणे आता सहन केले जाणार नाही.

वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना

खासदार साहेबांनी तात्काळ पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांशी संयमाने आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच वागावे, अशा कडक सूचना त्यांनी यावेळी दिल्या. जनतेच्या प्रश्नांवर थेट रस्त्यावर उतरून प्रशासनाला जाब विचारण्याच्या खासदार नागेश पाटील आष्टीकर साहेब यांच्या या 'ऑन द स्पॉट' कार्यशैलीचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या कारवाईमुळे वाहनधारकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

## गेवराई येथील शासकीय विश्राम ग्रह येथे सवांद बैठक संपन्न

# बार्टी,आर्टि आणि सारथीच्या माध्यमातून विध्यार्त्यांनी शिक्षणाचा लाभ घ्यावा-आनंद सुतार

**दैनिक वादळ वार्ता**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याचे युवा नेते तसेंच मातंग समाज भूषण विद्यमान आमदार अमितजी गोरख साहेब यांचे निकटवरतीय मा. आनंद सुतार यांच्या उपस्थिती मध्ये गेवराई येथील शासकीय विश्रामग्रह येथे सवांद बैठक पार पडली.या बैठकीचे मुख्य उदिष्ट हे होते कि अनेक दिवसापासून आनंद दादा सुतार हे बीड जिल्ह्यात नव्हते त्यामुळे अनेक कार्यकरते,मित्रमंडळींचे फोन येत होते.काहींचे कामानिमित्त तर काहींचे भेट घेण्यासाठी त्यामुळे या सवांद बैठकीचे आयोजन सर्व मित्रमंडळ व गेवराईकर यांच्या भेटीगाटी होण्यासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकी दरम्यान युवा नेते आनंद सुतार यांनी सांगितलं कि सर्व समाजातील विध्यार्थ्यांनी बार्टी,आर्टि,सारथी या योजनेच्या माध्यमातून मोफत शिक्षणाचा लाभ घ्यावा.सारथी संस्थेद्वारे मराठा, कुणबी आणि मराठा-कुणबी समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिष्यवृत्ती पुरवली जाते. या अंतर्गत इयत्ता ९वी ते १२वीसाठी 'छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती' आणि उच्च शिक्षणासाठी 'डॉ. पंजाबराव देशमुख-सारथी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती' (२०२५-२६) योजनेद्वारे मदत दिली जाते.तसेच अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आर्टी ही महाराष्ट्र शासनाची संस्था आहे,जी अनुसूचित जाती प्रवर्गातील,विशेषत मातंग समाजाच्या सामाजिक,शैक्षणिकआर्थिक आणि सांस्कृतिक सर्वांगीण विकासासाठी योजना राबवते। ही संस्था बार्टीच्या धर्तीवर मातंग समाजाच्या उत्थानासाठी कार्यरत आहे.या माध्यमातून मातंग समाजातील विध्यार्त्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान युवा नेते आनंद सुतार यांनी सवांद बैठकीत केले आहे.



तसेच समाजातील कुठलेही प्रश्न असतील स्मशानभूमीचा प्रश्न असेल, पोलीस स्टेशनचे प्रश्न असतील, तहसील चे कामे असतील, जिल्हा कार्यलयाचे कामे असतील, घरकुल चे कामे असतील अशी अनेक कामे आमदार अमीतजी गोरखे साहेब यांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल तसेच कुठलेही काम असो अर्ध्या रात्रीचे मला फोन करा मी तुमच्यासाठी हजार राहील असे वचन आनंद सुतार यांनी संवाद बैठकीत दिले.यावेळी उपस्थित मराठा चळवळीतील नेते मराठा योद्धा बाबुराव वाळेकर, गंगावाडीचे सरपंच भास्कर हातागळे,रमेश शिंदे,रणजित सुतार, राम अडागळे,पत्रकार शाम अडागळे,शरद अडागळे,गेवराई कर,आदी उपस्थित होते

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर मौजे कोल्हा येथे संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**

**परभणी । प्रतिनिधी**

आज मानवत तालुक्यातील कोल्हा येथे महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील अधिकारी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर संपन्न झाले. यावेळी अध्यक्षस्थानी तालुक्याचे तहसीलदार पांडुरंग माचेवाड तर प्रमुख उपस्थितीमध्ये तालुका समन्वय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी अरुणा संगेवार मॅडम, मुद्रांक जिल्हाधिकारी रतनसिंग साळक उपस्थित राहिले. यावेळी तालुक्यातील महसूल विभागाबरोबरच पंचायत समिती,तालुका कृषी कार्यालय, भुमिअभिलेख, दुय्यम निबंधक, आरोग्य विभाग,पशुसंवर्धन विभाग, शिक्षण विभाग, इत्यादी विभागातील प्रमुख व त्यांचे कर्मचारी त्यांच्या योजनेचे माहिती देण्यासाठी उपस्थित होते. यावेळी मंडळातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितीमध्ये प्रत्येक विभागाने आपल्या योजना उपस्थितांना सांगून त्यांचे समस्या निराकरण केले.यामध्ये प्रलंबित फेरफार, सातबारा, विविध दाखले,जसे रहिवास, उत्पन्न,जात ,आरोग्य कार्ड, शिधापत्रिका, कृषी खात्यामार्फत अवजारे, यंत्र वाटप, करण्यात आले.पांदन रस्त्याविषयी प्रत्यक्ष समस्या ऐकून घेऊन निराकरण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी तालुका कृषी अधिकारी कोरेवाड , गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, नायब तहसीलदार संजय खिल्लारे व इतर विभागातील प्रमुख अधिकारी यांचे उपस्थित होती.

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**

**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६

खरेदी खता अधारे

अर्जदाराचे नाव :- १) मिर्झा मुसद्दीख रफीक रा.नेकनुर २ ) मिर्झा शमशीर बेग रफीक बेग यांना श्री. फयाजोद्दीन इनायतुल्ला इनामदार रा. केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील

स.न.४८२/अ खुला प्लॉट नं----

वार्ड क्रं .१३ विभाग.कळंब रोड

चतु:सिमा

पुर्व : गुलाम मोहियोद्दीन व इतर

पश्चिम : २० फूट रुंदीचा रस्ता

दक्षिण : शाकेर महेबुबमियाँ इनामदार

उत्तर : फयाजोद्दीन इनायतुल्ला इनामदार

लांबी : पु.प. ४० फूट रुंदी : द.उ. ३६ फूट खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.१५४२ दि. ६/५/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

र.न.१५४२ दि.०/५/२०२५

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**

**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६

खरेदी खता अधारे

अर्जदाराचे नाव :- १) जावेद निजाम शेख

याना श्री.जहीर महेमूदमियाँ इनामदार यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील

स.न.४८२ /अु खुला प्लॉट नं----

वार्ड क्रं .८ विभाग.कळंब रोड

चतु:सिमा

पुर्व : इसाकोदीन अशकोदीन व इतर

पश्चिम : २० फूट रुंदीचा रस्ता

दक्षिण : जहिर महेमुदमियाँ इनामदार

उत्तर : अजीज तुराब सय्यद

लांबी : पु.प.१२.१९ मि. रुंदी : द.उ.१२.१९ मि.

खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.१४८६ दि. ३०/४/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**

**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१०/३/२०२६

खरेदी खता अधारे

अर्जदाराचे नाव :- नजीमोद्दीन निजामोद्दीन शेख रा.केज यांना श्री खदिरमियाँ इब्राहीम खुरेशी रा. केज यांचे कडुन खालील चतु :सिमेच्या आतील घर नंबर (१)२-३-५७/२ (२) घ.न.२-१-७/१ (३) घ.न.२-३-५७/१

वार्ड क्रं. १२ विभाग-मंगळवार पेठ

भाग नं. (१) घ.न.२-३-५७/२ पू.प.१५ फूट द.उ.५४ फूट

भाग नं. (२) घ.न.२-१-७/१ पू.प.१८ द.उ.२३ फूट

एकच भाग नं. (३)घ.न.२-३-५७/१पू.प.१५ द.उ.२० फूट

चतु:सिमा

पुर्व : शेख महबूब व नाईकवारे बाबुराव

पश्चिम : रस्ता

दक्षिण : शेख सलीम

उत्तर : बाबुराव बळीराम इंगळे व अब्दुल रशीद अब्दुल रहीम

खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.४०४ दि. १०/२/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे .

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### जाहीरनामा

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज.जि .बीड

एम ए जी विभाग

क्र.२०२६/ एमएजी/ कावि /१८२

दिनांक १३/०३/२०२६

सर्व जनता मोजे भाटुंबा ता.केज यांना जाहीर केले जाते की, भाटुंबा येथील जन्म पावलेली इसम नामे स्वाती सुग्रीव जोगदंड हिचा जन्म दिनांक -२२/०२/१९९३ रोजी मौजे भाटुंबा ता. केज येथे झालेला असून व जन्म नोंद आदेश ग्रामसेवक ग्राम पंचायत भाटुंबा यांना देणे बाबत त्यांचे आई नामे अनिता सुग्रीव जोगदंड रा. भाटुंबा ता. केज जि.बीड यांनी या कार्यालयास दि. १३/०३/ २०२६ रोजी अर्ज व शपथपत्र सादर करून सोबत ग्राम पंचायत भाटुंबा यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र नोटरी करून शपथपत्र सादर करून ग्राम पंचायत भाटुंबा ता. केज यांना त्यांच्या मुलीचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/-स्वाती सुग्रीव जोगदंड हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिद्धी पासून १५ दिवसाच्या आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय भाटुंबा ता. केज यांना जन्म नोंद घेणे चा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्व:क्षारित**

**कार्यकारी दंडाधिकारी केज**

## आदित्य शिक्षण संस्थेच्या स्नेहसंमेलनाची सुरुवात

**बीड (प्रतिनिधी)**-विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा देखणा आविष्कार आणि उत्स्फूर्त सहभागाच्या वातावरणात येथील आदित्य शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पारंपरिक नृत्य, देशभक्तीपर गीत, नाटिका, समूह सादरीकरणांनी स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवसाला विशेष रंगत आणली. उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळाली. आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत आहे.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला बीड शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा होते. यावेळी सीए गिरीश गिल्डा, आदित्य शिक्षण



संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा तसेच संचालिका डॉ. आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्नेहसंमेलनांचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केली. सूत्रसंचालन संग्राम तनपुरे व प्रतीक्षा सुसर यांनी केले. आभार डॉ. अमोल सानप यांनी मानले.

# सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन करणार-पोलिस अधीक्षक नवनीत कावत

## पोलीस अधीक्षक नवनीत कावत एलसीबी चे पीआय शिवाजी बंटेवाड यांचा सत्कार संपन्न

## माजलगावात सराफ सुवर्णकार असोसिएशनचा भव्य मार्गदर्शक मेळावा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

शासनाच्या परिपात्रानुसार सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक तालुक्यातून सराफा व्यापाऱ्यांचे दोन - दोन प्रतिनिधीची निवड करत ती नावे शासनाकडे पाठवले जाणार असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सांगितले. माजलगाव येथील सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने (आयपीसी ४११ /बीएनएस ३१७) संदर्भात सुवर्णकार व्यापाऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने आयोजित मार्गदर्शक मेळावा व कर्तव्यदक्षता व जनसेवा गौरव मेळावा कार्यक्रमात बोलत होते. पुढे बोलतांना पोलिस अधीक्षक नवनीत काँवत म्हणाले की, सराफ व्यापाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा प्रत्येक दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर सीसीटीव्ही लावावेत आणि सोने विकायला आलेला खरेदीसाठी आलेला या माणसांची पारख करावी. अनोळखी माणसाकडून सोने खरेदी करू नये तसेच सराफी व्यापाऱ्यांचे एखाद्या गुन्हेगाराने नाव घेतले तर त्या व्यापाऱ्यास पोलीस लगेच अटक करणार नाहीत तर सदर प्रकरणात सखोल माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई केली जाईल. पोलिस आणि जनता हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत जनतेने पोलिसांना मदत करावी पोलीस ही त्यांना मदत करण्यास तत्पर आहेत असे आवाहन त्यांनी केले. तसेच शिवाजी बंटेवाड यांनी देखील उपस्थित सुवर्णकार बांधवांना मार्गदर्शन करताना कायद्याचे पालन केल्यास व्यापाऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असे सांगितले. सुवर्णकारांनी सीसीटीव्ही कॅमेरे, व्यवहारांची नोंदवही व ग्राहकांच्या ओळखपत्राची तपासणी यांसारख्या सुरक्षा उपाययोजना वाढवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने नवनीत काँवत,



शिवाजी बंटेवाड यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहनराव जगताप,तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेश रोकडे, बाबुराव पोटभरे, गणेश बेंद्रे, वैभव शहाणे, माधव निर्मळ, मंगेश लोळगे, अनंत रुद्रवार, प्रभाकर कुलथे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम बापू येवले तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, तालुकाध्यक्ष पांडुरंग उगले, या. समाज कल्याण सभापती कल्याण आबुज, आयपीएस अधिकारी राहुल कुमार तसेच पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यास माजलगाव परिसरातील सुवर्णकार व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना कायदेशीर बाबींची माहिती मिळाल्याने भविष्यातही अशा मार्गदर्शक मेळाव्यांचे आयोजन करावे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना मोहनराव जगताप यांनी सराफ व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय करीत असताना डोळ्यात तेल

घालून अत्यंत सावध राहून हा व्यवसाय करावा आणि आधुनिक तंत्राचा वापर करावा असे आवाहन यावेळी केले. प्रास्ताविक सराफ सुवर्णकार असोसिएशनचे माजलगाव तालुका अध्यक्ष रामराजे रांजवण, यांनी केले. शिवाजी बंटेवाड, गजानन बोकन यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण झोडगे गोविंद गोचडे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सराफा सुवर्णकार असोसिएशन सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

## महिला विभागाची बैठक उत्साहात नव्या वर्षाच्या कामाचा आराखडा जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नॅशनल अँटिक प्राईम अँड ह्यूमन राईस ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य महिला विभाग यांची बैठक उत्साहात पार पडली. या संस्थेचे फाउंडर श्री जॉन सॅम्युअल आणि महाराष्ट्र राज्याचे चेअरमन रमाकांत साळवी यांच्या नेतृत्वाखाली महिला विभागाच्या चेअरपर्सन सौ. सुगंधा सोंडे आणि वाईस चेअरपर्सन डॉ. साक्षी आशिष भोईटे यांनी केले.




या बैठकीला महिला विभागातील इतर सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान मागील वर्षातील विविध सामाजिक उपक्रम आणि केलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच नव्या वर्षात संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक आणि जनजागृतीच्या उपक्रमांबाबत कामाचा अहवाल सादर करण्यात आला.

महिलांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. आगामी काळात विविध सामाजिक प्रश्नांवर सक्रियपणे काम करत महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविण्याचा संकल्पही सदस्यांनी व्यक्त केला.बैठकीच्या शेवटी सर्व सदस्यांनी संघटनेची कामे अधिक जोमाने आणि समन्वयाने पार पाडण्याचा निर्धार केला.

## सांची बुद्ध विहारात बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे उदघाटन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुक्याच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ. आंबेडकर भवन केसापूरी कॅम्प येथे दि २१ मार्च रोजी होत आसलेल्या भव्य धम्म मेळाव्याच्या अनुशंगान बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे तसेच बाभळगाव व कल्याणनगर या ठीकाणी महिला उपासिका शिबीराचे आयोजन करण्यात आले त्या श्रामणेर शिबीराचे उदघाटन दि. १३ मार्च रोजी करण्यात आले त्या शिबीरासाठी संघनायक म्हणुन पुज्य भन्ते डॉ. बी सारीपुत्त महाथेरो यांनी शिबीरार्थी ना श्रामणेर दिक्षा दिली या शिबीरासाठी केंद्रिय शिक्षक म्हणुन डॉ. युवराज मोरे नांदेड हे आहेत या शिबीराचे उदघाटन



भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे अध्यक्ष आद.ॲड. बी बी धन्वे यानी केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते. या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे बीड पुर्व च्या महिला अध्यक्षा कमलताई डोंगरे, सरचिटणीस आद.डॉ संतोष बोबडे , संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, आशाताई मोरे, हे उपस्थीत होते.

## नवीन अभ्यासक्रमात इयत्ता साहावी पासूनच व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्राधान्य-डॉ.गिरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन परिषद पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षणसंस्था अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने केज तालुक्यातील माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व प्रत्येकी एक शिक्षक यांना दोन दिवसाचे व्यावसायिक प्रशिक्षण व उद्योजिकता या संदर्भाने प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी डायटच्या वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.भागीरथी गिरी म्हणाल्या की,आता शिक्षणात बराच बदल झाला आहे.पूर्वीप्रमाणे शिक्षण राहिलेले नसून काळाबरोबर शिक्षणात बदल होत आहेत.मागे दहा वर्षाला एकदा अभ्यासक्रम बदलायचा परंतु आता दरवर्षी अभ्यासक्रम व शिक्षणात अपडेट येत आहे.



त्याप्रमाणे शिक्षण देणे गरजेचे आहे.यापुढे सर्वांनाच शिक्षणाच्या माध्यमातून सरकारी नोकरी मिळेलच असे नाही म्हणून नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये इयत्ता सहावीच्या वर्गापासून व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या कलानुसार, आवडीनुसार त्याला शिक्षणा बरोबरच व्यावसायिक शिक्षण पालकांनी व शिक्षकांनी शालेय जीवनापासूनच देण्यास सुरुवात करावी असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. मुलांना त्यांच्या आवडी नुसार शिक्षण घेऊ द्या त्यांच्यावर पालकांच्या अशा अपेक्षांची ओझे लादू नका मुले नक्कीच स्पर्धेत टिकतील व स्वतः सक्षम बनतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.तसेचयावेळी केजचे अध्यक्ष अड. उद्धवराव कराड सर यांनी विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता कौशल्या धिष्ठित रोजगाराभिमुख शिक्षण घेऊन स्वतः सक्षम बनावे व रोजगार शोधणारा न बनता रोजगार देणारा बनावे असे मत व्यक्त केले.या दोन दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी उपलब्ध करूनदेणे, करियर मार्गदर्शन, रोजगाराच्या संधी अशा अनेक विषयांवरती मार्गदर्शन करण्यात आले यावेळी व्यासपीठावर जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे वरिष्ठ अधिव्याख्याता व केज तालुक्याचे समन्वयक डॉ.जयपाल कांबळे सर, सुलभक श्री.मधुकर घुगे सर,श्री.बनकर सर,डॉ. कविता गित्ते मॅडम आदी उपस्थित होते.केज तालुक्यातील माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व प्रत्येकी एक शिक्षक मोठ्या संख्येने प्रशिक्षणास उपस्थित राहिले.

## सोनिजवळा येथे इफ्तार पार्टी संपन्न रमेशराव आडसकर यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

सोनिजवळा ता.केज येथे मुस्लीम समाज व समस्त गावकरी बांधव यांच्या वतीने आयोजित ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीत अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते श्री.रमेशराव आडसकर,अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा केज पंचायतसमिती चे मा.उपसभापती युवा नेते श्री.ऋषीकेश भैय्या आडसकर,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष श्री.अमर भैय्या पाटील,शहराध्यक्ष अजहरभाई इनामदार, युवा नेते रणजित दादा आडसकर गावचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष गोविंद ससाणे, संतोष क्षिरसागर, डोईफोडे,बाबू गायकवाड,भागवत कोकाटे,बालासाहेब कोकाटे,बंडू कोकाटे, प्रताप वैरागे,महादू वसेकर,बाळासाहेब ससाणे,सोमनाथ ससाणे,



अशोक दादा वैरागे, स्वामी विवेकानंद शाळेचे सचिव शंकरजी पाखरे, अविनाश ससाने,माजी मंडळाधिकारी भागवत पवार,मधुकर पटेकर, सोनिजवळा गावचे ग्राम रोजगार सेवक अरुण पटेकर,अरबाज पठाण, लाईक पठाण,विशाल सूर्यवंशी,व्हॉइसचेअरमन हुसेन पटेल,पांडुरंग ससाणे,कार्यक्रमाचे अयोजक अंबा साखर कारखान्याचे संचालक मिनाज पटेल व गावातील सर्व जाती धर्मातील ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम १७ मार्च रोजी

दैनिक वादळ वार्ता
**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद जालना आणि महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन (डी.एन.ई. १३६) जिल्हा शाखा जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुक्तेश्वर लॉन्स, जालना येथे आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद जालना अंतर्गत ग्रामपंचायत अधिकारी तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांना एकत्रित व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक सुनील कुमार पठारे, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे राज्याध्यक्ष संजीव निकम उपस्थित राहणार आहेत.

तसेच मुख्य वित्त व लेखा अधिकारी सुधीर चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) राजेंद्र तुबाकले, सर्व विभागप्रमुख, गटविकास अधिकारी तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या वेळी सन २०२३-२०२४ या वर्षातील आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी शारदा दादाराव साबळे (जालना), विलास भीमराव गायकवाड (बदनापूर), जनार्दन जिजाऊ भोसे (अंबड), रणजीत चिमाजी पटेकर (घनसावंगी), गंगासागर बलभीम गायकवाड (परतूर), नरेंद्र बाबुलाल पवार (मंठा), रघुनाथ सुखदेव सोनुने (भोकरदन) आणि कल्पना गजेंद्र सुलताने (जाफराबाद) यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

तसेच सन २०२४-२०२५ या वर्षातील आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी गजानन विष्णू सातपुते (जालना), अंकुश कौतिकराव हिरेकर (बदनापूर), गीतांजली राधाकृष्ण वल्ले (अंबड), किशोर भागवत वखरे (घनसावंगी), प्रशांत श्रीराम लाळे (परतूर), शिवशंकर राधाकृष्ण विधाते (मंठा), येडूबा राजाराम वाघ (भोकरदन) आणि राजेश विठ्ठल परिहार (जाफराबाद) यांचा गौरव करण्यात येणार आहे.

याशिवाय महाराष्ट्र शासनाचा सन २०२४-२०२५ या वर्षातील राज्य आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार प्राप्त प्रवीण बाबुराव पवार यांचा परिवारासह विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी तसेच इतर विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) संदीप पवार यांनी केले आहे. हे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे राज्य उपाध्यक्ष दुर्गा भालके, राज्याध्यक्ष प्रवीण पवार, जिल्हाध्यक्ष डी. बी. काळे, जिल्हा सरचिटणीस व्ही. ए. भगत, कोषाध्यक्ष ए. आर. काकडे, कार्याध्यक्ष एम. एम. मिसाळ तसेच जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनीही केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077